**पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय ,**
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे ४११ ००८
दुरध्वनी क्रमांक ०२०- २५६५७८७८ फॅक्सक्र. ०२०-२५६७४६४१
ई मेल sp.pune.r @mahapolice.gov.in
(आस्थापना शाखा)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

जा. क्र. आशा-१/प्रलि/पोलीस भरती-२०२१/२०२२/ १३८३५ पुणे दिनांक :- २८/१०/२०२२.

**संदर्भ :-** पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.प्रशि./पो.शि.भरती- प्रक्रिया २०२१/१८८/२०२१/३२९५, दिनांक २७/१०/२०२२

Maharashtranama.com

**विषय :-** चालक पोलीस शिपाई भरती २०२१ ..

---------ooooo------------

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरुन कळविणेत येते की, या आस्थापनेवरील सन २०२१ चालक पोलीस शिपाई रिक्त पदांची भरती प्रक्रीयेच्या अनुषंगाने दि.०३/११/२०२२ ते दि.३०/११/२०२२ या कालावधीत आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे भरण्यांत येणार आहे. तरी सोबत जोडलेल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात दि. ०१/११/२०२२ रोजी अपलोड करून पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करण्यांत यावा.

**(मितेश घट्टे)**
प्रभारी पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.

**प्रति,**
प्रभारी अधिकारी, सायबर पो.स्टे, पुणे ग्रामीण.

pc मोरेब

प्रभारी अधिकारी
आवक क्र. 2241/2022
तारीख :- 28 / 10 / 2022
सायबर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण

D:\SB - 01 RAHUL\POLICE BHARTI 20-21\POLICE BHARTI LETTERS 2020-21.DOCX

Scanned by Scanner Go

**संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात**

## महाराष्ट्र राज्य चालक पोलीस शिपाई भरती सन - २०२१

## पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण चालक पोलीस शिपाई भरती सन - २०२१

**जाहिरात क्रमांक ०२** **ठिकाण - पुणेग्रामीण** **दिनांक ०१/११/२०२२**

महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक,पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम २०१९ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक २७/०६/२०२२ व दिनांक २३/०९/२०२२ व दिनांक २३/०९/२०२२ च्या केलेल्या सुधारीत तरतुर्दीनुसार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवर सन २०२१ मध्ये जिल्हा पोलीस शिपाई चालक संवर्गात रिक्त झालेली (९०) पदे भरण्यासाठी देखील आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे दिनांक ०३/११/२०२२ ते ३०/११/२०२२ या कालावधीत स्विकारण्यात येतील. ह्या बाबत सविस्तर माहिती policerecruitment2022.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या महितीकरिता प्रसिध्द करण्यात आली आहे.

**चालक पोलीस शिपाई :-**

**चालक पोलीस शिपाई भरती सन २०२०-२०२१**

Maharashtranama.com

| अ.क्र | घटकाचे नांव | सामाजिक आरक्षण | अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | विमाप्र | इमाव | इडब्ल्युएस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | समांतर आरक्षण | | | | | | | | | | | |
| १ | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण | सर्वसाधारण | ५ | ३ | १ | १ | ० | ० | १ | २ | ५ | १६ | ३४ |
| २ | | महिला ३०% | ३ | २ | १ | १ | ० | ० | ० | ४ | २ | १५ | २८ |
| ३ | | खेळाडू ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | ३ |
| ४ | | प्रकल्पग्रस्त ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | ३ |
| ५ | | भूकंपग्रस्त २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ६ | | माजी सैनिक १५% | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | ८ | १३ |
| ७ | | अंशकालीन पदवीधर ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | ३ |
| ८ | | पोलीस पाल्य ३% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| ९ | | गृहरक्षक दल ५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | ३ |
| | | एकुण | ९ | ६ | २ | २ | ० | ० | १ | १२ | ८ | ५० | ९० |

एकून रिक्त पदांच्या १ % इतकी पदे अनाथ प्रवर्गासाठी आरक्षीत करण्यात यावीत व महिला व बालविकास शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३ दिनांक २३.०८.२०२१ नुसार भरती बाबत योगय ती कार्यवाही करण्यात येत आहे.

Scanned by Scanner Go

- उमेदवारास पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करणेची सुविधा policerecruitment2022.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.

- उमेदवार एकाच घटकात एका पदासाठी एकापेक्षा जास्त आवेदन अर्ज सादर करु शकत नाही.

- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.

- पोलीस शिपाई चालक या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारिरीक चाचणी परीक्षा घेण्यात येईल .सदर शारीरिक चाचणीत किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त जागांच्या .१:१० या प्रमाणात उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र ठरतील

Maharashtranama.com

- लेखी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना, हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची व जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी २५ गुणांची अशी एकूण ५० गुणांची कौशल्य चाचणी द्यावी लागेल. सदर दोन्ही चाचण्यांमध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवून उमेदवारास उत्तीर्ण व्हावे लागेल. कौशल्य चाचणी ही केवळ एक अर्हता चाचणी असून कौशल्य चाचणीत मिळालेले गुण , गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकुण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत. कौशल्य चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

- पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवरील भरती प्रक्रिया वगळता इतर सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.

- शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमूद केलेल्या एकूण गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसूची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवड सुचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांची मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येईल. कागदपत्रे पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (Provisional selection) निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये. शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणाची एकत्रीकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दि.१०/१२/२०२० नुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यांत येईल.

- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरूध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

Scanned by Scanner Go

- शासनाने लागू केलेले खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी लागू केलेले आरक्षण हे या आनुषंगाने उद्‌भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधिन असेल.
- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता,आवश्यक असलेली प्रमाणपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती,परीक्षा शुल्क,आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना policerecruitment2022.mahait.orgया संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत.सदरहू जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचून,समजून घ्यावी. तसेच, सामाजिक ,समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १ % आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतु खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.

Maharashtranama.com

**महत्वाची टीप :-**

जिल्हा पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवाराने त्याबाबतची माहिती ॲन्टीकरप्शन, ब्युरो, पुणे यांना दूरध्वनी क्रमांक (०२०) २६१२२१३४ /२६१३२८०२/१०६४ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती-२०२०-२१ तथा अपर पोलीस अधीक्षक / पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय यांचेशी संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयात (०२२) २२०२३६३७ या दूरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचण भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| **अ.क्र.** | **संस्था / कार्यालयाचे नाव** | **दुरध्वनी / मोबाईल क्रमांक** |
|---|---|---|
| १. | पोलीस अधीक्षक कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | ००२०-२५६५०८७ |
| २. | पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय, पुणे ग्रामीण | ०२०-२५६५११२७ |
| २. | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यालयीन वेळेत) | ०२२-२२०२३६३७ |
| ३. | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांचे **e-mail id:-** | adg.trg.office@mahapolice.gov.in |

**(मितेश घट्टे)**
प्रभारी पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.

D:\SB - 01 RAHUL\POLICE BHARTI 20-21\POLICE BHARTI LETTERS 2020-21.DOCX

Scanned by Scanner Go